RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ८०] बुधवार, जून २८, २०१७/आषाढ ७, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ जून २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस ०८१४/प्र. क्र. ६६७/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र बिअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ यामध्ये सुधारणा करण्याकरिता, पुढील नियम तात्काळ अंमलात आणावेत याबाबत महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ; आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे, पूर्व प्रसिद्ध न करता हे नियम तयार करण्यात यावेत ;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १४३ चे पोट-कलम (२) चा खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र बिअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

(१) या नियमांमध्ये, महाराष्ट्र बिअर आणि वाईन निर्मिती (सुधारणा) नियम, २०१७, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र बिअर व वाईन निर्मिती नियम, १९६६ याच्या नियम २ मध्ये, (एक) खंड (एकवीस) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(एकवीस-अ) "मीड वाईन" याचा अर्थ, मधासोबत मसाले किंवा फळे यांचे मिश्रण करून किंवा न करता, प्रामुख्याने मधापासून किण्वण उत्पादित होत असताना, बाहेरील मद्यार्काचे मिश्रण न करता किण्वणाद्वारे उत्पादित केलेली आणि मद्यार्क तीव्रता प्रुफ स्पिरीटच्या ४२ टक्क्याहून अधिक नसलेली, अशी वाईन असा आहे.

(दोन) खंड (सत्तावीस) मध्ये, "द्राक्षे किंवा इतर फळे" या शब्दानंतर "किंवा फुले किंवा केळी (देठ म्हणून वर्गीकृत)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th June 2017.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS. 0814/C. R. 667/EXC-3.—Whereas,the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act ( XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*c*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966, as follows namely :—

1. These rules may be called the Maharashtra Manufacture of Beer and Wine (Amendment) Rules, 2017.

2. In rule 2 of the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966,(i) after clause (*xxi*) the following clause shall be inserted, namely :—

"(*xxi-a*) "mead wine" means wine manufactured by fermenting honey with or without addition of spices or fruits, the fermentation being produced principally from honey without addition of external alcohol and having alcoholic strength not exceeding 42 per cent of proof spirit;";

(ii) in clause (*xxvii*), after the words, "grapes or other fruits" the words "or flowers or banana (*classified as stem*)" shall be inserted .

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.